जा.क्र.वि.शा./निवडणूक/७०२/२०१६
पोलीस उप आयुक्त विशेष शाखा-०१पुणे शहर
दिनांक :-१६/११/२०१६

**विषय :- फौजदारी दंड प्रक्रिया संहीता १९७३ चे कलम १४४ प्रमाणे आदेश.**

आदेश.

ज्याअर्थी मा.भारत निवडणुक आयोग, नवी दिल्ली यांचे कडील क्रमांक ३२२/ LET/FUNC/ BIEN/MT-LC-LAC/२०१६ दि.१९/१०/२०१६ व ECI /PN/६१/२०१६ दि. १९/१०/२०१६ लगत मा.मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकडील बीआयई -२०१६/प्र.क्र. ४५९/१६/३३ दिनांक १९/१०/२०१६ रोजीचे पत्रान्वये पुणे स्थानिक प्राधिकारी मतदार संघातुन महाराष्ट्र विधान परिषदेची व्दिवार्षिक निवडणूक २०१६ चा कार्यक्रम जाहीर करण्यात आलेला आहे. पुणे शहर पोलीस आयुक्त कार्यक्षेत्रामध्ये १) कै.मधुकर पवळे सभागृह, पिंपरी चिंचवड मनपा बिल्डिंग पिंपरी पुणे. २) महात्मा गांधी सभागृह ६ वा. मजला जिल्हा परिषद, पुणे. ३) कॅप्टन वडके सभागृह, पुणे मनपा, बिल्डिंग पुणे. ही मतदान केंद्रे असुन, दिनांक १९/११/२०१६ रोजी विधान परिषदेचे मतदान होणार आहे व दिनांक २२/११/२०१६ रोजी **शासकिय अन्नधान्य गोदाम क्र. सी-५, सी-६ शिवाजीनगर, पुणे** येथे मतमोजणी होणार आहे. सदर मतमोजणीची प्रक्रिया सुरळीतपुणे व शांततेत पार पडण्यासाठी कायदा व सुव्यवस्था सार्वजनिक मालमत्तेच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने सार्वजनिक उपद्रव टाळण्यासाठी **शासकिय अन्नधान्य गोदाम सी-५, सी-६ शिवाजीनगर, पुणे-५** येथील २०० मीटर परिसरात निर्बंध घालणे जरुरीचे आहे. अशी माझी खात्री झालेली आहे.

त्याअर्थी मी, **सुनिल रामानंद, पोलीस सह आयुक्त, पुणे शहर** या आदेशान्वये फौजदारी दंड प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४ अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा आदेश देतो की, **शासकिय अन्नधान्य गोदाम सी-५, सी-६ शिवाजीनगर, पुणे-५** येथील २०० मीटर परिसरात दि.२१/११/२०१६ चे ००.०१ वा. पासुन ते मतमोजणी प्रक्रिया पुर्ण होई पर्यंत खालील प्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

१) मतमोजणीच्या परिसरात कोणत्याही प्रकारचे अधिकृत-अनाधिकृत हत्यारे तसेच परवान्यावरील कोणत्याही प्रकारची हत्यारे घेवुन फिरणेस या आदेशान्वये मनाई करीत आहे.

सदरचा आदेश कायदेशीर कर्तव्य बजावीत असलेल्या शासकीय कर्मचा-याला (पोलीस दल,संरक्षण दल, तुरुंग विभाग, बँक सुरक्षा विभाग व इतर केंद्रीय तसेच राज्य शासनाचे अधिकारी व कर्मचारी यांना ) लागु राहणार नाही.

२) मतमोजणीच्या परिसरात मोबाईल,कॉर्डलेस फोन,पेजर वारण्यास अगर घेवुन येण्यास मनाई करण्यात येत आहे. (कर्तव्यावर असणा-या शासकिय अधिकारी/कर्मचारी यांना हा आदेश लागु राहणार नाही)

३) मतमोजणीच्या परिसरात खाजगी इसमांना ध्वनीक्षेपकाचा वापर करण्यास मनाई करण्यात येत आहे.

४) मतमोजणीच्या परिसरात कोणताही मजकुर लिहीण्यास अगर छापील मजकूर प्रदर्शित करण्यास मनाई करण्यात येत आहे.

५) मतमोजणीच्या परिसरात शासकीय वाहने सोडून कोणत्याही प्रकारचे वाहन आत नेण्यास मनाई करण्यात येत आहे.

६) मतमोजणीच्या परिसरात पासशिवाय प्रवेश करण्यास मनाई करण्यात येत आहे.

७) मतमोजणीचा निकाल जाहिर झाल्यानंतर दि. २२/११/२०१६ रोजी विजय मिरवणुका काढण्यास सक्त मनाई करण्यात येत आहे.

सदर आदेशाचे उल्लंघन करणारी व्यक्ती भा.दं.वि. कलम १८८ अन्वये शिक्षस पात्र राहील.
सदरचा आदेश माझे सही शिक्यानिशी आज दि१५/११/२०१६ रोजी दिला आहे.